**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (प.),
ता.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१
/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० – २५२५१०७
ई-मेल :vasaivirarcoporation@yahoo.com

जावक क्र: व.वि.श.म./घ.क.व्य./११६३/२०२६
दिनांक :१२/१०/२०२६.

## फेर जाहिर दरपत्रक सुचना

वसई विरार शहर महानगरपालिकेत एकल वापर प्लास्टिक बंदी अंतर्गत जप्त करण्यात आलेले प्लास्टिक रिसायकलिंग करिता Recycler कडे देणेच्या कामाकरिता दर मिळणेकामी फेर जाहीर दरपत्रक सुचना www.vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे सहाव्या मजल्यावरील सुचना फलकावर प्रसिध्द करुन दि.१४/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दि.२२/१०/२०२६ रोजी ४.०० वाजेपर्यंत या कालावधीत इच्छूक संस्था यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि.२२/१०/२०२६ रोजी ४.०० वाजेपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, यशवंतनगर, विरार (प.) येथे पाचवा मजला, सहा. आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे दालनात सादर करावे. प्राप्त झालेले दरपत्रक दि.२२/१०/२०२६ रोजी दु.४.३० वाजता शक्य झाल्यास ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष मा.उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) यांच्या दालनात उघडण्यात येतील.

| अ.क्र | कामाचा तपशिल | प्रति टन रक्कम (सर्व करांसहित) | |
|---|---|---|---|
| | | रूपये (अंकात) | रूपये (अक्षरात) |
| १ | Single Use Plastic (Carry Bags, Glass, Spoons, Straw, Cups, plates, Big Plastic Bags etc.) | | |

## अटी व शर्ती

१. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन साक्षांकित केलेले व सशर्त दरपत्रक फेटाळण्यात येतील.
२. दरपत्रकांचे लिफाफे सिल केलेले असावेत, एकदा सादर केलेली दरपत्रके विनंती अर्ज देवूनही परत घेता येणार नाही.
३. सदर संस्था MPCB अधिकृत असणे गरजेचे आहे व संस्थाने दर सादर करताना कामाची पाहणी करून सर्व करांसहीत दर सादर करावेत.
४. दरपत्रक धारकाने आपल्या कंपनीचे पॅनकार्ड, GST प्रमाणपत्र, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, MPCB संमती प्रमाणपत्र, EPR (Extended Producer Responsibility) प्रमाणपत्र बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.
५. मंजुर दरपत्रक धारकास स्वखर्चाने वाहतुकीकरण करून प्रभागनिहाय प्लास्टिक जमा करून घ्यावे.

६. कामाबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील व त्याचे पालन दरपत्रकधारकांस बंधनकारक राहील.

७. मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांना राहील.

८. आमच्याकडून देण्यात येणारे एकल वापर प्लास्टिक कोणत्याही स्वरूपात असले तरी ते स्वीकारणे बंधनकारक राहील.

९. आमच्याकडून सुपूर्द करण्यात आलेल्या प्लास्टिकचे पुनर्वापर/पुनर्प्रक्रिया (Recycling) महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत कर्मचाऱ्यांच्या समक्ष करणे रिसायकलरला बंधनकारक राहील.

१०. प्लास्टिकचे रिसायकलिंग करताना त्याचे विघटन करून प्लास्टिकचे दाणे तयार करीत असल्याची व तद्नंतर त्यापासून प्लास्टिकचे थैल्याव्यतिरिक्त इतर उत्पादने तयार केलेबाबतची video क्लिप मनपास सादर करणे बंधनकारक राहील त्यासाठी मनपाकडे आगाऊ रु. २ लक्ष इतका रक्कमेचा भरणा (Performance Bank Guaranty) करावा लागेल व खातरजमा झालेनंतर सदर रक्कमेस ठेकेदारास परतावा केला जाईल.

११. व.वि.श.म. अंतर्गत (उपायुक्त, सहा. आयुक्त) यांचे मार्फत प्लास्टिक Recycle करीत असलेल्या जागेची व प्लास्टिक पुनर्चक्रितचे दाणे तयार करीत असल्याची पाहणी करण्यात येईल.

सही/-
उपायुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका